BC 21-22

# विपुल

वर्ष १ अंक २ रा

[illegible] – २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

| | | |
|---|---|---|
| 33. | आंबेडकरी शाहीर: वामनदादा कर्डक<br>- प्रा. सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 138 - 141 |
| 34. | वामनदादा कर्डक यांच्या गीतरचनेतील शैलीविशेष – गेयता<br>- डॉ. जया जितेंद्र कदम | 142 - 145 |
| 35. | महाकवी वामनदादा कर्डक : आंबेडकरी तत्वज्ञानाचा काल-आज व उद्याचा चेहरा<br>- प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 146 - 155 |
| 36. | लोककवी वामनदादा कर्डक यांची स्त्रीगीते<br>- डॉ. देवमन दत्तुजी कामडी | 156 - 159 |
| 37. | वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- डॉ. सुखदेव इधारे | 160 - 166 |
| 38. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन<br>- प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | 167 - 170 |
| 39. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- डॉ. राजाराम अं. झोडगे | 171 - 173 |
| 40. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील सामाजिक बांधिलकी : शोध व स्वरूप<br>- प्रा. निखिल भिकाजी उंबरकर | 174 - 178 |
| 41. | तुकोबांच्या कुळातील लोककवी: वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये | 179 – 181 |
| 42. | आंबेडकरी चळवळीचा तेजोमय दीप<br>- प्रोफेसर डॉ.शैलेश विश्वनाथ त्रिभुवन | 182 - 184 |
| 43. | आंबेडकरवादी लोकशाहीर वामनदादा कर्डक<br>- प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना | 185 - 187 |
| 44. | लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते<br>- प्रा. डॉ. विलास खुणे | 188 - 191 |
| 45. | शोषितांचा हृदयस्पर्शी आवाज : महाकवी वामनदादा कर्डक<br>- प्रा.डॉ. संबोधी एम. देशपांडे | 192 - 194 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांची राष्ट्रीय कविता<br>- प्रा.डॉ. विश्वास शं. पाटील | 195 – 200 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजीकता<br>- डॉ. रंजना मधुकर कदम | 201 – 204 |
| 48. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे | |
| 49. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे स्वरुप आणि विचार<br>- प्रा.डॉ. चंद्रशेखर निवृत्ती एंगडे प्रा. संजय नामदेवराव आठवले | 205 - 210 |


PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya

Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA SELU



# वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता

डॉ. राजाराम अं. झोडगे
मराठी विभाग प्रमुख,
नूतन महाविद्यालय, सेलू जि.परभणी.
मो. 9420786972

लोककवी, शाहीर, लोकगायक, महाकवी अशा विविध विशेषणांनी गौरविल्या गेलेल्या वामनदादा कर्डक यांनी मराठी चित्रपटगीते, नाट्यगीते, स्वाभिमान गीते अशी हजारो गीते लिहिली. या गीतांनी मराठी काव्यसृष्टीत मोलाची भर घातली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याला प्रमाण मानून त्यांचे स्वातंत्र्य समता, बंधुता, न्यायाचे तत्वज्ञान साध्या, सोप्या भाषेत आपल्या गीतांतून घराघरात पोहोचवले हजारो वर्ष दारिद्र्य, शोषण, दुःखाच्या अंधःकारात खितपत पडलेल्या समाजाला न्याय, समता, शिक्षणाचा सूर्य दिसला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने स्वतंत्र अस्तित्वच नाकारलेल्या अस्पृश्य, पददलितांना माणूस म्हणून ज्यांच्यामुळे ओळख मिळाली त्या प्रज्ञासूर्य डॉ आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार ही वामनदादांच्या लेखनाची प्रेरणा होती त्यामुळे सहाजिकच त्यांच्या लेखणीने कल्पनेच्या विश्वात रमून मनोरंजन करण्याऐवजी वास्तव जीवनाचा वेध घेत समाजाचे प्रबोधन करण्यात धन्यता मानली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा ही त्रिसूत्री दिली. त्यात त्यांनी पहिले स्थान दिले ते शिक्षणाला. अज्ञान हे मनुष्याच्या अधोगतीचे, शोषणाचे मूळ कारण आहे; कारण जोपर्यंत आपण काय करतो आहोत? कशासाठी? नि कुणामुळे करतो आहोत? याची जाणीव व्यक्तीला होत नाही तोपर्यंत तो त्या परिस्थितीलाच आपले प्राक्तन किंवा हेच जगणे आहे असे समजत असतो. त्याला वास्तवाची,सत्याची जाणीव होते ती शिक्षणामुळे. गुलामाला आपण गुलाम आहोत हेच मुळी माहित नसते. अशावेळी त्याला त्याची जाणीव करून दिली तरच तो त्या परिस्थितीविरुद्ध बंड करून उठू शकेल आणि ही जाणीव करून देण्याचे काम शिक्षण करते. त्यामुळे 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हा बाबासाहेबांचा विचार वामनदादांनी आपल्या गीतांतून समाजापर्यंत पोहोचवला

"गाठा खेडे गाठा वाटा
ज्ञान धनाचा साठा
या साठ्याने दिसती साऱ्या
उद्धाराच्या वाटा
हाच भिमाचा प्रचार आता
गल्ली गल्लीला वाटा
वाटा ज्ञानधनाचा साठा."

शिक्षणानेच आपल्या प्रगतीच्या वाटा खुल्या होतील हा संदेश दिला. मुलांचा परिवाराचा विकास करायचा असेल तर शिक्षणासारखे दुसरे साधन नाही. म्हणून वामनदादा म्हणतात-

"लेखणीची जिथे चाड आहे



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

NUTAN MAHA... SELU

बालकांची तिथे वाढ आहे
लेखणीची जिथे साथ आहे
ते घराणे पुढे जात आहे."

त्यामुळे कुणीही शिक्षणाच्या प्रवाहात मागे राहता कामा नये. एकेकाळी विशिष्ट वर्गाची मक्तेदारी असणारे शिक्षण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे सर्वांनाच उपलब्ध झाले आहे सर्वसामान्यांचीही मुलं आता शिकून मोठे साहेब होऊ शकतील घर-दार सुखी होईल. दुःख-दारिद्र्य नष्ट होईल असे शिक्षणाचे महत्त्व आपल्या गीतांतून ते समाजाला पटवून देतात बाबासाहेबांची वाणी आणि वामनदादांची गाणी यातून बोध घेऊन अनेकजण आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी आग्रही होतात 'पैंच्याला साळंत घाला' या कवितेतून त्याचे प्रत्ययकारी चित्रण वामनदादा करतात. निसर्गतः सर्व माणसे समान आहेत. निसर्गाने स्त्री-पुरुषांव्यतिरिक्त मानवामध्ये अन्य कुठलेही भेद निर्माण केले नाहीत परंतु येथील समाजव्यवस्थेत कपटी, कुटिल हेतूने जाती-धर्माची निर्मिती झाली. जातींवरून उच्चनीचता मानली गेली. परिणामी समाज एकसंध न राहता तुकड्यांमध्ये विभागला गेला निम्नवर्गाच्या वाट्याला पशुवत जगणे आले. त्यामुळे व्यक्तीच्या आणि एकूणच समष्टीच्या विकासात अडसर ठरणारी जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. समता प्रस्थापित झाली पाहिजे. यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी परिवर्तनाचा लढा सुरू केला. चातुर्वर्ण्यवादी धर्म, व्यवस्थेवर आसूड ओढले. डॉ. आंबेडकरांचा हा समतावादी सामाजिक विचार वामनदादांनी आपल्या गीतांतून पेरला वर्णवर्चस्ववादी मानसिकतेला आव्हान देताना कर्डक म्हणतात-

"भीम, फुले माणसाला भेटला
माणसाचा लढा आज पेटला
माणसाला जाळणाऱ्या
शिवाशिव पाळणाऱ्या माणसा
तुला तुझा काळ आता भेटला..."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचा लढा हा माणसासाठीचा, माणुसकीचा लढा होता; ज्याने अस्पृश्यता पाळणाऱ्यांना, भेदाभेद करणाऱ्यांना आस्मान दाखवले. या दोघांच्या रूपाने त्यांना त्यांचा काळच भेटला. सर्वांनी जातीपातींची बंधनं तोडली पाहिजेत याच मातीत जन्मलेले आपण सर्व भारतमातेचे सुपुत्र आहोत. एक नवा बलशाली देश घडविण्यासाठी आपण पुढे आले पाहिजे.

"साळी, माळी, सुतार, कोळी
हवी कशाला जात ही
इथेच जगता इथेच मरता
इवल्याशा काळपात
एक बनवा देश आपुला."

अशा गीतांतून वामनदादा समतावादी, समृद्ध, बलशाली भारतासाठी प्रयत्नरत राहण्याचे आवाहन करतात. तुटलेली मने आणि दुभंगलेला समाज कधीही प्रगती करू शकत नाही त्यामुळे तुटलेले दुवे सांधून एकतेची माळ गुंफण्यासाठी

"सांगू किती मी दादा
एकतेने येथे नांदा
सारी भीमाईची बाळ
एकतेची गुंफा माळ
तुटले दुवे ते सांधा"

अशी आर्त विनवणी ते पुन्हा पुन्हा करतात. भांडणं, दंगली करणाऱ्यांना ते म्हणतात -

"मैदानी येऊन, बेभान होऊन
दंगल नका रे करू
जगू द्या जगाला तुम्हीही जगा
सुख संसाराचे तुम्हीही बघा

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

अशा शब्दांत 'जगा आणि जगू द्या' चा, शांतीचा संदेश ते देतात "माझं गाणं माणसांची मनं जोडणारं असतं तोडणारं नसतं" असं ते म्हणतात. विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेला वामनदादा आपल्या गीतांतून फटकारतात. ज्या धर्माने ही विषमता पसरवली तो धर्मही ते नाकारतात. आत्मोन्नतीसाठी समानतेवर आधारित राज्याची स्थापना ते करू इच्छितात. 'स्थापू समानतेचं राज' या कवितेत ते म्हणतात -

"आत्मोन्नती करून घ्याया उठ मानवा आज
स्थापू समानतेचे राज ||
उच्चनीचता थोर हीनता
क्षुद्र भावना नको ती आता
नको अधर्म नको भ्रष्टता
जगी मानवी हवी एकता
जातीयता घालवून राखू ये धर्माची लाज ||"

उच्चनीचता पाळणे, क्षुद्र भावना मनी बाळगणे हा अधर्म आहे. भ्रष्टता आहे. जन्मावरून जात ठरवणारा,असंख्य जाती, नाना दैवते व अनिष्ठ रुढी-परंपरा असणारा धर्म नाकारून खऱ्या धर्माची व्याख्या करताना ते म्हणतात 'जेथे शुद्ध आचार, अहिंसा आणि बंधुत्वाचे नाते असते तेथेच खरा पवित्र धर्म नांदतो.' आणि असा धर्म डॉ. बाबासाहेबांनी आम्हाला दाखवला. तथागत गौतम बुद्ध ज्याचे निर्माते आहेत त्या बौद्ध धर्माचे अनुयायी होऊन समानतेचे राज्य स्थापन करू असे आवाहन ते समाजाला करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या व्यवस्थेशी दोन हात करून वंचितांना, उपेक्षितांना त्यांचे हक्क मिळवून दिले लोकशाही आणि संविधानाच्या माध्यमातून सामान्यातील सामान्य व्यक्तीही निवडणूक लढवून विधिमंडळ, संसदेत जाऊ शकेल. सर्वांना प्रतिनिधित्व मिळेल; अशी व्यवस्था निर्माण केली.ज्यामुळे सर्वसामान्य माणूस संसदेपर्यंत जाऊ शकला परंतु सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा मिळताच हाच सर्वसामान्य माणूस असामान्य होऊन बसला आणि ज्या समाजाने त्याला मोठं केलं त्या समाजालाच तो विसरला. अशी अनेक उदाहरणं भारतीय राजकारणात आपल्याला आढळतील. अशा कृतघ्न नेत्यांना वामनदादा प्रश्न विचारतात -

'तुझ्या हाती तूप आलं तुझ्या हाती साय समाजाचं काय आता समाजाचं काय?' समाजाच्या जिवावर मोठे होऊन तुम्ही सत्तेची फळे चाखत आहात. तुमच्यासाठी तुमच्याकडे बंगला, गाडी, पैसा सगळं काही आहे परंतु ज्या समाजानं तुला इथपर्यंत पोचवलं त्या समाजासाठी तुझ्यापाशी आहे तरी काय? असा जळजळीत सवाल ते करतात. मात्र टाळी एका हाताने वाजत नाही. कृतघ्न, भ्रष्ट पुढाऱ्यांना, प्रतिनिधींना त्यांची जागा दाखवण्यासाठी दर पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुका आणि मताचे मिळालेले शस्त्र याचा योग्य वापर समाजही करत नाही. त्यामुळे वामनदादा समाजालाही आपल्या गीतांतून फटकारतात-

"तुम्हीच करता गुन्हा
लबाड,लुच्चा लुटणाराला
निवडून देता पुन्हा".

जे गोरगरिबांना पिळून खातात, त्यांचे शोषण करतात, भ्रष्टाचार करतात अशा पुढाऱ्यांची सत्यता कळूनही मतदानाची वेळ येता पुन्हा तुम्ही त्यांच्याच मागे जाता अन्याय-अत्याचार, विटंबना, शोषण, भ्रष्टाचाराचे मूक साक्षीदार होता. आपल्याला त्याची जराही चीड येत नाही मग दोष कोणाला देऊ? असा उद्विग्न सवाल ते समाजाला करतात. स्त्रियांचा समाजातील दर्जा, त्यांना मिळणारी वागणूक याबाबतही वामनदादांची कविता भाष्य करते. सामाजिक एकतेत त्यांना स्त्री-पुरुषांतील दर्जाची समानताही अभिप्रेत आहे. येथील व्यवस्थेत मात्र स्त्रीकडे एक 'वस्तू' म्हणूनच पाहिले गेले.

"रांगडी रीत इथल्या जगाची
काय सांगू तुम्हा मंडळीला
स्त्री असे खेळणे या जगाचे
गांजती येथे लोक खुळीला'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीमुक्ती साठी प्रयत्न केले तिला स्वातंत्र्य, सन्मान व न्याय हक्क मिळाले पाहिजेत



PRINCIPAL
an Mahavidyalaya
U. Dist. Parbhani

यासाठी घटनात्मक तरतुदी केल्या. परिणामी चूल नि मूल एवढ्यापुरतीच सीमित राहिलेली स्त्री मुक्त झाली. शिक्षण आणि नवविचारांनी तिलाही आत्मभान आले. अशी स्वाभिमानी आणि बंडखोर बंडखोर स्त्री ही नवक्रांतीचा आधार बनली. अन्यायाविरुद्धच्या लढाईत पेटून उठण्यासाठी 'मंजुळा' या कवितेत वामनदादा म्हणतात -

"नीच नीतीचा काप्, गळा त्या रक्ताचा लेवू टिळा
मंजुळापाजळ आपुला विळा न चल ग रणामधी'

परिवर्तनाच्या, मानवतेसाठीच्या लढाईत आता स्त्रीनेही मागे न राहता पुढे येण्याचे आवाहन कर्डक करतात.

भारतात श्रीमंत आणि गरीब ही दरी अजूनही कमी होण्याचे नाव घेत नाही. व्यक्तीचा सर्वांगीण विकास केवळ सामाजिक समतेतूनच होईल असे नाही. सामाजिक समतेतून त्याला 'माणूस' म्हणून ओळख मिळेल परंतु जेव्हा माणसाच्या पोटाचा प्रश्न येतो तेव्हा अर्थ, पैसा ही बाब महत्त्वाची ठरते.त्यामुळे आर्थिक समानता हा विचारही समाजधुरिणांच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ग्रंथांतून भाषणातून यावर भाष्य केलेले आहे. संपत्तीचे विषम वाटप हा मुद्दा घेऊन वामनदादा कर्डक आपल्या गीतांतून व्यवस्थेला धारेवर धरतात.

"सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठाय हो?
सांगा धनाचा साठा, आमचा वाटा कुठाय हो?"

देशातील बोटावर मोजता येणाऱ्यांकडेच संपत्तीचा मोठा हिस्सा कसा?आमच्या कष्टकऱ्यांच्या घामाचं मोल काय?संपत्तीचं सारं लोणी एकीकडे तर दुसरीकडे भुकेनं तळमळणारे जीव!एकीकडे लज्जा झाकण्या पुरते ही वस्त्र मिळत नाही तर दुसरीकडे कपड्यांच्या राशी! अशी ही विषमता ज्या व्यवस्थेने निर्माण केली त्या व्यवस्थेकडे वामनदादा आपला वाटा मागतात. सामाजिक विषमतेबरोबरच आर्थिक विषमता दूर करण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांचे सैनिक होऊन, घराघरात नवा विचार पोचवायचा आहे. राबणारा उपाशी आणि ऐतखाऊ मात्र तुपाशी ही स्थिती बदलून आधी राबणाराला, श्रमिकांना त्यांच्या हक्काचे चार घास मिळाले पाहिजेत अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी संघर्ष करायचा आहे त्यासाठी -

"आता सोडून बिर्ला,टाटा
मागू धनात अर्धा वाटा
शेतवाडीमधी, उंच माडीमधी हट्ट विभागणीचा धरू."

आमच्या हक्काचे जे आहे ते आम्हाला मिळालं पाहिजे. केवळ धनामध्येच नव्हे तर शेतजमीन,घरे यामध्येही वाटा मिळाला पाहिजे असा आग्रह वामनदादांची कविता धरते.

एकूण, 'माणूस' हा वामनदादांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. माणसापेक्षा मोठे काही नाही. त्यामुळे माणसाने सारे भेदभाव विसरून परस्परांना प्रेम द्यावे. चातुर्वर्ण्यव्यवस्थेने निर्माण केलेली उच्चनीचतेची उतरंड नष्ट करून कुणीही लहान-मोठा न मानता समानतेची वैभवशाली इमारत उभी राहावी असा आशावाद वामनदादांची कविता व्यक्त करते.

"माणसा इथे मी तुझे गीत व्हावे
तुझे गीत गावे तुझे हित व्हावे
असे गोड नाते तुझ्याशी जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे'

अशाप्रकारे वामनदादांच्या गीतातील प्रत्येक शब्द मानवतेची, समतेची, न्यायाची, स्वातंत्र्याची ओवी गाणारा आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1) कर्डक, वामन - माझ्या जीवनाचं गाणं (शब्दांकन- प्रा रविचंद्र हडसनकर), निर्मल प्रकाशन, नांदेड. प्र.आ. 1996 पृ.87
2) कर्डक, वामनदादा - तुफानातले दिवे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद. नोव्हें. 2011
3) भवरे, महेंद्र- मराठी कवितेच्या नव्या वाटा, लोकवाङ्मयगृह, मुंबई. प्रा.आ. जुलै, 2007.


* * * * *


PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani